**११. निवडीची पध्दत :-**

ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जातील माहितीनुसार पात्र ठरणा-या उमेदवारांची महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०७/१८/प्र.क्र.३२३/फ-४, दिनांक २८/८/२०१८ नुसार खालीलप्रमाणे उल्लेखित केलेल्या कार्यपध्दतीनुसार निवड करण्यात येईल –

**११.१ लेखी परीक्षाः-**

११.१.१ पात्र असलेल्या उमेदवारांची १२० गुणांची स्पर्धात्मक लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये खालीलप्रमाणे ४ विषयांना गुण देण्यात येईल.

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | सामान्य ज्ञान<br>(सामान्य ज्ञान, महाराष्ट्र राज्याचा भूगोल व इतिहास,वन, पर्यावरण, हवामान, जैव विविधता, वन्यजीव, पर्यावरण संतुलन ) | ३० |
| २ | बौध्दीक चाचणी | ३० |
| ३ | मराठी | ३० |
| ४ | इंग्रजी | ३० |

११.१.२ लेखी परीक्षा ही माध्यमिक शालांत (१० वी) पातळीची राहील.

११.१.३ लेखी परीक्षा ही नियोजित स्थळी ऑनलाईन पध्दतीने संगणकावर घेण्यात येईल.

११.१.४ लेखी परीक्षा ही ९० मिनिटाची राहील. लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील व प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक १ गुण ठेवण्यात येतील.उत्तर चुकल्यास प्रती प्रश्न ०.५ इतके गुण कमी करण्यात येतील.

११.१.५ ४५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणारे उमेदवार भरतीच्या पुढील टप्प्याकरिता पात्र राहतील. ज्या उमेदवारांना किमान ४५% गुण मिळणार नाहीत ते उमेदवार भरतीच्या पुढील टप्प्यासाठी बाद ठरतील.

११.१.६ उमेदवारांना परीक्षा दालनात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास / वापरण्यास सक्त मनाई आहे.

११.१.७ परीक्षा दालनात परीक्षेच्या वेळेपूर्वी ९० मिनिट अगोदर हजर राहणे बंधनकारक राहील. परीक्षेवेळी इकडे-तिकडे बघणे, डोकावणे, तोतयागिरी करतांना आढळल्यास उमेदवारास परीक्षा केंद्राबाहेर पाठविण्यात येईल.

## ११.२ लेखी परीक्षेचा निकाल :-

लेखी परीक्षेचा वनवृत्तावार निकाल Maha Pariksha portal (www.mahapariksha.gov.in) चे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

## ११.३ शारीरिक मोजमाप व धाव चाचणी घेणे :-

लेखी परीक्षेत ज्या उमेदवारांनी किमान ४५% गुण प्राप्त केले आहेत अशा उमेदवारांची तपासणी खालील प्रमाणे प्रादेशिक निवड समितीद्वारे करण्यात येईल.

११.३.१ वयोमर्यादा, आरक्षण प्रवर्ग इत्यादीबाबत उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येऊन जे उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करणार नाहीत ते भरती प्रक्रियेतून बाद ठरतील. कागदपत्र तपासणीच्या वेळी प्रपत्र-३ मध्ये दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११.३.२ वनरक्षक पदाच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार किमान शारीरिक पात्रता (उंची, छाती इत्यादी) धारण करतात किंवा कसे हे निश्चित करण्याच्या दृष्टीने शासकीय वैद्यकिय अधिकारी यांच्या उपस्थितीत उमेदवारांची शारीरीक मोजमापे घेण्यात येतील. जे उमेदवार विहित शारीरिक पात्रता धारण करणार नाही ते भरती प्रक्रियेतून बाद होतील.

११.३.३ कागदपत्र तपासणी व शारीरिक मोजमाप यामध्ये अपात्र ठरलेले उमेदवार वगळून इतर पात्र उमेदवारांनी धावण्याच्या चाचणीकरीता शारीरिक दृष्ट्या सुदृढ असल्या बाबतचे प्रमाणपत्र वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन धावण्याच्या चाचणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. (सोबत जोडलेल्या प्रपत्र १ व २ प्रमाणे)

११.३.४ शारीरिक मोजमाप व धावण्याची चाचणीची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित प्रादेशिक निवड समिती यांची राहील. सदर धावण्याच्या चाचणीचे ठिकाण वनविभाग यांच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

११.३.५ वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त प्रमाणपत्राचे आधारे, पुरुष उमेदवारांची ३० मिनीटात ५ कि.मी. धावण्याची चाचणी घेण्यात येईल व महिला उमेदवारांची २५ मिनिटात ३ कि.मी. धावण्याची चाचणी घेण्यात येईल. जे उमेदवार धाव चाचणी तील विहित वेळेत पूर्ण करणार नाही ते भरती प्रक्रियेतून बाद ठरतील.

११.३.६ महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०७/ १८/प्र.क्र. ३२३ /फ-४, दिनांक २८/८/२०१८ नुसार, धावण्याच्या चाचणीत नोंदविलेल्या वेळेचे अनुषंगाने उमेदवारांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे गुण देण्यात येतील.

| पुरुष उमेदवार ५ कि.मी. अंतर धावण्याची चाचणी (एकूण गुण : ८०) | | |
|---|---|---|
| अ.क्र. | धावण्याची चाचणी पूर्ण करण्यासाठी लागलेला कालावाधी (मिनिटांमध्ये) | अनुज्ञेय गुण |
| १ | १७ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ८० |
| २ | १७ मिनीट पेक्षा जास्त परंतु १८ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ७० |
| ३ | १८ मिनीट पेक्षा जास्त परंतु १९ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ६० |
| ४ | १९ मिनीट पेक्षा जास्त परंतु २० मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ५० |
| ५ | २० मिनीट पेक्षा जास्त परंतु २१ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ४५ |
| ६ | २१ मिनीट पेक्षा जास्त परंतु २२ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ४० |
| ७ | २२ मिनीट पेक्षा जास्त परंतु २३ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ३५ |
| ८ | २३ मिनीट पेक्षा जास्त परंतु २४ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ३० |
| ९ | २४ मिनीट पेक्षा जास्त परंतु २५ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | २५ |
| १० | २५ मिनीट पेक्षा जास्त परंतु २६ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | २० |
| ११ | २६ मिनीट पेक्षा जास्त परंतु २७ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | १५ |
| १२ | २७ मिनीट पेक्षा जास्त परंतु २८ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | १० |
| १३ | २८ मिनीट पेक्षा जास्त परंतु २९ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ५ |
| १४ | २९ मिनीट पेक्षा जास्त परंतु ३० मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ० |
| ३० मिनीटांमध्ये ५ कि.मी. धावू न शकणारा पुरुष उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद होईल. | | |

| महिला उमेदवार ३ कि.मी. अंतर धावण्याची चाचणी (एकूण गुण : ८०) | | |
|---|---|---|
| अ.क्र. | धावण्याची चाचणी पूर्ण करण्यासाठी लागलेला कालावाधी (मिनिटांमध्ये) | अनुज्ञेय गुण |
| १ | १२ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ८० |
| २ | १२ मिनीट पेक्षा जास्त परंतु १३ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ७० |
| ३ | १३ मिनीट पेक्षा जास्त परंतु १४ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ६० |
| ४ | १४ मिनीट पेक्षा जास्त परंतु १५ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ५० |
| ५ | १५ मिनीट पेक्षा जास्त परंतु १६ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ४५ |
| ६ | १६ मिनीट पेक्षा जास्त परंतु १७ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ४० |
| ७ | १७ मिनीट पेक्षा जास्त परंतु १८ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ३५ |
| ८ | १८ मिनीट पेक्षा जास्त परंतु १९ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ३० |
| ९ | १९ मिनीट पेक्षा जास्त परंतु २० मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | २५ |
| १० | २० मिनीट पेक्षा जास्त परंतु २१ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | २० |
| ११ | २१ मिनीट पेक्षा जास्त परंतु २२ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | १५ |
| १२ | २२ मिनीट पेक्षा जास्त परंतु २३ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | १० |
| १३ | २३ मिनीट पेक्षा जास्त परंतु २४ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ५ |
| १४ | २४ मिनीट पेक्षा जास्त परंतु २५ मिनीट किंवा त्यापेक्षा कमी | ० |
| २५ मिनीटांमध्ये ३ कि.मी. धावू न शकणारी महिला उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद होईल. | | |

११.३.७ कागदपत्र तपासण्या, शारीरिक मोजमाप तपासणी व धावण्याची चाचण्या या शक्यतो एकाच दिवशी घेण्यात येईल. तथापी प्रत्यक्ष स्थानिक परिस्थितीचा आकलन करून याबाबत प्रादेशिक निवड समिती निर्णय घेईल.

११.३.८ कागदपत्र तपासण्या, शारीरिक मोजमाप तपासणी व धावण्याची चाचणी या प्रक्रियेत अपात्र उमेदवार या टप्प्यावरच भरती प्रक्रियेतून बाद ठरतील. पात्र व अपात्र ठरलेले उमेदवारांची यादी www.mahaforest.gov.in चे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

## ११.४ सर्वसाधारण गुणवत्ता यादी :-

लेखी परीक्षेत प्राप्त गुण व धाव चाचणीतील प्राप्त गुण यांची एकत्रित बेरीज करून गुणवत्ता यादी तयार करून ती प्रादेशिक निवड समिती मार्फत www.mahaforest.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

## ११.५ निवड यादी व प्रतिक्षा यादी जाहीर करणे:-

११.५.१ प्रादेशिक निवड समितीने सर्वसाधारण गुणवत्ता यादीचे आधारे सामाजिक / समांतर आरक्षण विचारात घेऊन रिक्त पदांच्या अनुषंगाने निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येऊन ती www.mahaforest.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. सदर निवड सूचितील उमेदवारी ही चाळ चाचणी यशस्वीपणे पूर्ण करण्याचे अधीन राहील. निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करताना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक १२१६/ (प्र.क्र.६५/१६) /१३-अ, दिनांक १३/०६/२०१८ मधील अनुक्रमांक १२ चे अनुषंगाने प्रवर्ग निहाय उमेदवारांची संख्या खालील प्रमाणे असेल.

| अ.क्र. | प्रवर्गनिहाय रिक्त पदांची संख्या | निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या |
|---|---|---|
| १ | १ | ३ |
| २ | २ ते ४ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ३ | ५ ते ९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते. |
| ४ | १० ते ४९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५ | ५० किंवा याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के. |

११.५.२ निवड यादीतील सर्व उमेदवार व प्रतिक्षा यादीतील गुणाक्रमे ५०% उमेदवार (परंतु किमान १ उमेदवार) वनरक्षक पदासाठी ४ तासात पुरुष उमेदवारांना २५ कि.मी. व महिला उमेदवारांना १६ कि.मी. चालण्याची किंवा धावून किंवा चालून व धावून शारीरिक क्षमता चाचणी पूर्ण करावी लागेल. जे उमेदवार सदर चाचणी विहित वेळेत पूर्ण करु शकणार नाही ते भरती प्रक्रियेतून बाद ठरतील. सदर उमेदवारास चालण्याची चाचणी करिता दुसरी संधी दिली जाणार नाही.

११.५.३ निवड सूचितील उमेदवार चालण्याची चाचणीमध्ये अनुउत्तीर्ण झाल्यास त्यांचे ऐवजी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा निवडीसाठी विचार करण्यात येईल. यानंतरही त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार कमी पडत असल्यास संबंधित प्रवर्गातील सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील उर्वरित उमेदवारांचा निवडीसाठी विचार करण्यात येईल.

११.५.४ भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर, मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक अटी / निकषांसंदर्भात कोणतीही सूट / सवलत घेतली असल्यास अशा